MHRG040058982025

## <u>दिवाणी चौकशी अर्ज क्र.१८१५/२०२५</u>

सौ लता अनंत जाधव, वगैरे
विरुध्द
कोणीही नाही.

## <u>आदेश निशाणी क्र. १ वर</u>

१. प्रस्तुत अर्ज बॉम्बे रेग्युलेशन अक्ट, १८२७ प्रमाणे वारस दाखला मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे कथन असे आहे की, **बबन कमलाकर भुजबळ** यांचे **२८/११/२०२०** रोजी रुबी हॉल क्लिनिक येथे निधन झाले आहे. तसेच मयत बबन कमलाकर भुजबळ यांची आई पार्वतीबाई कमळाकर भुजबळ या दिनांक ०९/०६/२०१० रोजी मयत झाल्या आहेत. अर्जदार क्र. १ व २ या मयत बबन कमलाकर भुजबळ यांच्या मुली, अर्जदार क्र. ३ व ४ हे मुलगे व अर्जदार क्र. ५ ही पत्नी आहे. मयत बबन कमलाकर भुजबळ यांना अर्जदार यांचेशिवाय इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदार हे मयत बबन कमलाकर भुजबळ यांचे अर्ज परिच्छेद क्र. ५ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीसंदर्भात वारस आहेत असा दाखला मिळण्यासाठी त्यांनी विनंती केली आहे.

३. अर्ज व त्यासोबत सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुत अर्ज दाखल केल्यानंतर जाहिरनामा व जाहिर नोटीस जारी करण्याचा आदेश पारीत करण्यात आला. पुढे नमूद केल्याप्रमाणे जाहिरनामा व जाहिर नोटीस प्रसिध्द केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| जाहिरनामा | **नि.क्र.०८** | प्रसिध्द दिनांक ०६/०२/२०२६ |
| जाहिर नोटीस वृत्तपत्र दैनिक ' **किल्ले रायगड** ' | **नि.क्र.१६** | प्रसिध्द दिनांक २०/०१/२०२६ |

जाहिरनामा व जाहिर नोटीस प्रसिध्द केल्यानंतर मुदतीत किंवा आजपर्यंत प्रस्तुत अर्ज कथनास कोणीही व्यक्तिंनी हरकत घेतलेली नाही.

५. अर्ज कथनाचे पुष्टयर्थ अर्जदारांनी शपथेवर पुरावा सादर केलेला आहे. तसेच अर्जदारांनी खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा सादर केलेला आहे.

| **निशाणी क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|
| **११** | अर्जदार क्र. १ यांचे स्वतःकरीता व कुलमुखत्यारी म्हणून अर्जदार क्र. २ ते ५ यांच्याकरीता पुराव्याचे प्रतिज्ञापत्र. |
| **१२** | मयत **बबन कमलाकर भुजबळ** याचे मृत्यु प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत. |
| **१३** | मयत **पार्वतीबाई कमलाकर भुजबळ** याचे मृत्यु प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत. |
| **१४** | अर्जात नमूद मिळकत– सदनिका क्र. १२०२, बी विंग, १२ वा मजला, रिध्दी सिध्दी रेसिडेन्सी को.ऑ. हौ.सो.लि., प्लॉट नं. ५३ आणि ५३अे, सेक्टर ३, क्षेत्र ७८०.९१ बिल्टअप + १६.३८ टेरेस, नविन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड बाबतच्या कराराची पडताळणी केलेली प्रत. |
| **एकत्रात १५** | अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या आधारकार्डांच्या पडताळणी केलेल्या प्रती. |

| | |
|---|---|
| **१७** | अर्जदार क्र. २ ते ५ यांनी अर्जदार क्र. १ यांच्या लाभात करुन दिलेल्या कुलमुखत्यार पत्राची नोटरी केलेले दस्त. |
| **१२** | अर्जदारांची पुरावा बंद पुरशीस. |

६. अर्जदाराने सादर केलेल्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, मयताची मिळकत या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत **बबन कमलाकर भुजबळ** यांचे वारस आहेत. त्यामुळे अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | अर्जदार क्र. १ **सौ. लता अनंत जाधव**, अर्जदार क्र. २ **सौ. मेघना संदेश भूमकर**, अर्जदार क्र. ३ **श्री. सुभाष बबन भुजबळ**, अर्जदार क्र. ४ **श्री. संतोष बबन भुजबळ** व अर्जदार क्र. ५ **श्रीमती इंदुमती बबन भुजबळ** हे मयत **बबन कमलाकर भुजबळ** यांचे कायदेशीर वारस आहेत असा दाखला देण्यात यावा. |
| ३. | अर्जदार यांनी सदर वारस दाखल्यावर महाराष्ट्र कोर्ट फी अक्टमधील शेडयुल–१ मधील आर्टिकल १२ सह आर्टिकल १० अन्वये आवश्यक तो मुद्रांक शुल्क दिल्यावर देण्यात यावा. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by NAYOMI PRAKASH PAWAR
Date: 2026.04.15 17:26:39 +0530

पनवेल. (नयोमी पी. पवार)

दिनांक – १५/०४/२०२६ दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, पनवेल.